भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर

ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur

An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२३ – २४: साप्ताहिक पीक सल्ला
## (कालावधी २६ डिसेंबर ते ०१ जानेवारी २०२३)

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | डिसेंबर | | | | | डिसेंबर/जानेवारी | | | | |
| | | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 28 | 29 | 30 | 31 | 01 |
|  | धुळे | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नंदुरबार | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | औरंगाबाद | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जालना | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बीड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नांदेड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | परभणी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | हिंगोली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वर्धा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नागपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | 64.5 to 115.5 मिमी | | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | मुसळधार पाऊस | | अति मुसळधार पाऊस | |

**पीक परिस्थिती:**

**अकोला:**

- अकोला येथे क्रॉपिसॅट बोंड फोडणे आणि वेचणीच्या अवस्थेत आहे.
- वेचणी चालू आहे.
- गुलाबी बोंडअळीचा जास्त प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी वर दिसला, म्हणजे नॉन बीटी आणि बीटी संकरीत २५-३०% पर्यंत.
- काही शेतात लीफ स्पॉट्सची नोंद झाली.

**नांदेड:**

- पीक काढणीच्या अवस्थेत आहे.
- मावा आणि पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव दिसून आला.
- काही शेतात राखाडी बुरशी दिसली. वेचणी चालू आहे.

**राहुरी:**

- पीक पेरणी ते वेचणीच्या अवस्थेत आहे.
- वेचणी चालू आहे.
- काही शेतात तुडतुडे आणि गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी वर दिसला.

**पीक सल्ला:**

अकोला येथे शेतकऱ्यांनी पुढच्या हंगामात गुलाबी बोंडअळीचा हल्ला टाळण्यासाठी डिसेंबरच्या शेवटी कापसाची संपूर्ण वेचणी करावी. जर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी ओलांडला असेल, तर सायपरमेथ्रीन १०% ईसी @ १०- १५ मिली किंवा सायपरमेथ्रिन २५% ईसी @ ४-६ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ईसी @ १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ ईसी @ १० मिली किंवा फेनप्रोपॅथ्रिन १०% ईसी@ १५-२० मिली किंवा फेनव्हॅलेरेट २० ईसी @ १० मिली किंवा अल्फा- सायपरमेथ्रीन १०% ईसी @ ६ मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पानावरील बुरशीजन्य ठिपक्यांचे व  राखाडी बुरशीचे व्यवस्थापन करण्यासाठी, कार्बेन्डाझिम १२ % + मॅनकोझेब ६३ % डब्ल्यूपी @ ३० ग्रॅम किंवा क्रेसोक्सिम-मिथाइल ४४.३ एस सी @१० मिली किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू +डायफेनोकोनाझोल  ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एस सी @१० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. शेतातून रोगट बोंडे आणि पिकांचे ढिगारे गोळा करून नष्ट करावे. वेगवेगळ्या संकरित कापूस स्वतंत्रपणे साठवावा. लवकर बीटी कापसाच्या वाणांची काढणी केल्यानंतर, अधिक आर्थिक फायद्यासाठी शेतकऱ्याकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास चणा किंवा गहू यापैकी दुसरे रब्बी पीक घ्यावे. शेतातून रोगट, प्रादुर्भावित बोंडे आणि संक्रमित पीक मलबा गोळा करून नष्ट करावा.

नांदेड येथे, शेतकऱ्यांना पानावरील बुरशीजन्य ठिपक्यांचे व राखाडी बुरशीचे व्यवस्थापन करण्यासाठी, क्रेसोक्सिम-मिथाइल ४४.३ एस सी @१० मिली किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एस सी @१० मिली किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅनकोझेब ६३ % डब्ल्यूपी @ ३० ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फक्त पूर्ण उघडलेले बोंडांचीच वेचणी करावी आणि कापूस स्वच्छ कोरड्या जागी साठवावा. वेगवेगळा संकरित कापूस स्वतंत्रपणे साठवावा. कापूस साठवण्यापूर्वी सावलीत वाळवावा. डिसेंबरच्या शेवटी कापसाची संपूर्ण वेचणी करून पीक नष्ट करावे. शेतातून रोगट बोंडे आणि पिकांचे ढिगारे गोळा करून नष्ट करावे.

राहुरी येथे, शेतकऱ्यांना पूर्णपणे उघडलेले स्वच्छ कापसाचे बोंडे उचलणे सुरू करावे. बाजारात चांगला भाव मिळण्यासाठी प्रादुर्भाव नसलेल्या आणि गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव झालेला कापूस वेगवेगळा निवडावा. जर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी ओलांडला असेल, तर सायपरमेथ्रीन १०% ईसी @ १०- १५ मिली किंवा सायपरमेथ्रिन २५% ईसी @ ४-६ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ईसी @ १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ ईसी @ १० मिली किंवा फेनप्रोपॅथ्रिन १०% ईसी@ १५-२० मिली किंवा फेनव्हॅलेरेट २० ईसी @ १० मिली किंवा अल्फा- सायपरमेथ्रीन १०% ईसी @ ६ मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पानावरील बुरशीजन्य ठिपक्यांचे आणि राखाडी बुरशीच्या व्यवस्थापणासाठी क्रेसोक्सिम-मिथाइल ४४.३ एस सी @१० मिली किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू +डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एस सी @१० मिली किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅनकोझेब ६३ % डब्ल्यूपी @ ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कार्बेन्डाझिम १२% मॅनकोझेब ६३ % डब्ल्यूपी @ ३०  ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०  डब्ल्यूपी @ ४  ग्रॅम किंवा प्रोपिकोनाझोल २५  ईसी @ १०  मिली किंवा मेटीराम ५५ % + पायराक्लोस्ट्रोबिन ५ % डब्ल्यूजी @ २०  ग्रॅम किंवा

अझॉक्सिस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्लू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी @ १० मिली किंवा फ्लूक्सापायरॉक्साड १६७ ग्रॅम/ लिटर + पयरक्लासट्रोबीन ३३३ ग्रॅम/ लिटर एससी @ ६ मिली १० लिटर पाण्यात मिसळून बोंड सड रोगाच्या संकुलाचे आणि पानावरील बुरशीजन्य ठिपक्यांचे व्यवस्थापन करावे. शेतातून रोगट बोंडे आणि पिकांचे ढिगारे गोळा करून नष्ट करावे. पुढच्या हंगामात गुलाबी बोंडअळीचा हल्ला टाळण्यासाठी डिसेंबरच्या शेवटी कापसाची संपूर्ण वेचणी करून पीक नष्ट करावे. शेतकऱ्यांनी उरेलेले खोड आणि खराब उघडलेले बोंडे गुरे आणि मेंढ्यांना चरण्यास द्यावे.

Detailed information regarding cotton production technology, e.g. selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc. can be availed from an android based **CICR Cotton App** developed by ICARCICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from Google play store. Additionally, the crop growth stage specific and weather based weekly advisory are uploaded on the website of ICAR-CICR also to be consulted for the benefit of farmers.